दावा दाखल तारीख ०५.०१.२०१८
दावा नोंद दिनांक ०५.०१.२०१८
निकाल दिनांक २७.०८.२०१८
कालावधी वर्ष ०० महिने ०७ दिवस २२

न्यायाधीश, सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी मु. अलिबाग यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सीसी/आरजीडी/०१/२०१८
निशाणी क्र. ५२

दि. अण्णासाहेब सावंत को. ऑप. बॅंक लि. महाड **वादी**
शाखा अलिबाग, तर्फे शाखाधिकारी नितीन राजाराम हाटे
वय - ५२ वर्षे, धंदा- नोकरी
रा. सरस्वती निवास घ.नं. ११००, बालाजी नाका
ता. अलिबाक, जि. रायगड

**विरुद्ध**

**जाबदेणार**

१) काजल विजय जैन
वय- २७ वर्षे, धंदा- नोकरी
रा. प्लॅट नं. ५, सागर दर्शन प्लाझा,
रामनाथ, ता. अलिबाग, जि. रायगड

२) अल्पेश अरविंद पाटील
वय- ३३ वर्षे, धंदा- नोकरी
रा. शिवलीला कॉम्प्लेक्स, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड

३) भावेश भालचंद्र पांचाळ
वय- २८ वर्षे, धंदा- व्यवसाय
रा. प्रणय हेल्थ क्लब, तळवलकर नगर,
ता. अलिबाग, जि. रायगड

वादीतर्फे वकील : ॲड. जे. बी. आपटे
जाबदेणार क्र. १ ते ३ एकतर्फा

**न्यायनिर्णय**

**(दिनांक २७.०८.२०१८)**

प्रस्तुत वाद रक्कम रुपये ३,४३,९३४/- च्या वसुलीसाठीचा आहे.

२.  वादीचे असे कथन आहे की, ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, नुसार नोंदणी केलेली संस्था आहे. जाबदेणार क्र.१ ते ३ हे तिचे सभासद आहेत. जाब देणार क्र. १ ने वादीकडे कर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जावरुन वादीने त्यास दिनांक ०४/०३/२०१६ रोजी रक्कम रु. ४,९०,०००/- इतके कर्ज अदा केले. सदर कर्जासाठी प्रतिवर्षी १४% असा व्याज दर ठरला होता. जाब देणार क्र. २ व ३ यांनी सदर कर्जासाठी जामीनकी स्विकारली आणि सर्व जाबदेणारांनी कर्जदाराचे प्रतिज्ञापत्र, कर्जरोखा, वचनचिठठी वगैरे कागदपत्रे सदर कर्जासाठी लिहून दिली. सदर कर्जाची ठरलेल्या मुदतीत परतफेड करण्याचे ठरले होते. मात्र जाबदेणारांनी सदर कर्जाची परतफेड मुदतीत केली नाही. त्यामुळे कर्ज रक्कम वसुलीसाठी वादीस प्रस्तुत वाद दाखल करणे भाग पडले.

३.  जाबदेणार क्र. १ ते ३ हे समन्स बजावणी होऊन देखील हजर न झाल्याने त्यांच्या विरुद्ध प्रस्तुत वादाचे कामकाज एकतर्फा चालण्याचा आदेश न्यायालयाने दिनांक २०/०३/२०१८ रोजी केला आहे.

४.  वाद व त्यासोबत वादीने दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता माझ्या विचाराधीन मुद्दे व त्यांवरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे :

| **अ.क्र** | **विचाराधीन मुद्‌दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने वादातील मागणी सिध्द् केली काय ? | अंशत: होकारार्थी |
| २. | अंतिम आदेश व निवाडा काय ? | वाद अंशत: मंजूर |

## कारणमिमांसा

५. आपल्या वादाच्या पुष्टयर्थ वादीने त्याचा माहितगार इसम नितीन राजाराम हाटे याची साक्ष नि.२१ येथे नोंदविली आहे. त्याला वादी संस्थने अधिकार दिल्याबद्दलचा ठराव नि.४३ येथे दाखल आहे. तसेच कर्जमागणी अर्ज नि.२२, वचनचिठठी नि.२७, हायर पर्चेस बॉड नि.२८, आणि खातेउतारा नि.४१ व कर्जासंबधी इतर कागदपत्रे वादीने दाखल केली आहेत. कर्ज कागदपत्रांवर कर्जदार आणि जामिनदार यांच्या सहया असलेचे वादीच्या साक्षीदाराने सांगितले आहे. वादीच्या पुराव्यास कोणतीही हरकत आली नसल्याने तो खोडून काढला गेलेला नाही. सबब, तो पुराव्यात वाचण्यात येत आहे. त्यानुसार वादीने जाबदेणार क्र.१ ला रु.४,९०,०००/- प्रतिवर्षी १४% व्याज दराने कर्जाऊ दिल्याचे आणि सदर कर्जास जाबदेणार क्र.२ व ३ हे जामीन राहिल्याचे स्पष्ट होते. खातेउतारा असे दर्शवितो की, वादीस जाबदेणारकडून दि.३१.१०.२०१७ अखेर मुददल रक्कम रू.३,३०,६९९/- आणि वसुली व इतर खर्च रक्कम रू.१३,२३५/- अशी एकूण रक्कम रू.३,४३,९३४/- ची मागणी वादीने केली आहे.

६. वादीने जाबदेणारांना पाठविलेल्या एकाच नोटीसीची स्थळप्रत वादाबरोबर जोडली असलेने त्याच नोटीसीचा खर्च वादीस देणेत येत आहे.

७. खाते उता-यावरील सर्व्हिस चार्जेस, वकील फी वगैरे ज्या रकमेबाबत दाव्यात उल्लेख नाही किंवा ज्याबाबत पुरावा दाखल केलेला नाही अशा रकमा मंजूर केलेल्या नाहीत.

८. कायद्याच्या निश्चित स्थितीनुसार दंडव्याजाची मागणी करता येत नसलेने वादीस दंडव्याज मंजूर केलेले नाही.

९. वसुली व इतर खर्च रकमेबाबत वादीने पुरावा दाखल केला नसलेमुळे अशा रकमा मंजूर केल्या नाहीत..

१०. यावरुन मी अशा निष्कर्षास आले आहे की, वादीस दिनांक ३१/१०/२०१७ अखेर कर्जापोटी रक्कम रु.३,१४,५५१/- येणे आहे. तसेच, सदर रकमेवर दिनांक ०१/११/२०१७ पासुन व्याज करारात ठरल्याप्रमाणे प्रतिवर्षी १४% व्याजदराने मंजुर करण्यात येत आहे. सदर रकमेच्या परतफेडीसाठी जाबदेणार क्र. १ कर्जदार म्हणून आणि जाबदेणार क्र. २ व ३ हे जामिनदार म्हणून संयुक्तिक व वैयक्तिकरित्या जबाबदार ठरतात.

उपरोक्त विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## **आदेश**

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदेणार क्र. १ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तीक व वैयक्तीकरित्या वादीस रु.३,१४,५५१/- दयावेत व संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत सदर रकमेवर दि.०१/११/२०१७ पासून प्रतिवर्षी १४% दराने होणारे सरळ व्याज दयावे.

३) येणे प्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

अलिबाग.
दिनांक २७.०८.२०१८

(एस्.एस्.पोरे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी
मु. अलिबाग.

# हुकूमनामा

## <u>न्यायाधीश, सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी मु. अलिबाग यांचे न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)

सीसी/आरजीडी/०१/२०१८
निशाणी क्र. ५३

दि. अण्णासाहेब सावंत को. ऑप. बॅक लि. महाड **वादी**
शाखा अलिबाग, तर्फे शाखाधिकारी नितीन राजाराम हाटे
वय - ५२ वर्षे, धंदा- नोकरी
रा. सरस्वती निवास घ.नं. ११००, बालाजी नाका
ता. अलिबाक, जि. रायगड

**विरुद्ध**

१) काजल विजय जैन **जाबदेणार**
वय- २७ वर्षे, धंदा- नोकरी
रा. प्लॅट नं. ५, सागर दर्शन प्लाझा,
रामनाथ, ता. अलिबाग, जि. रायगड

२) अल्पेश अरविंद पाटील
वय- ३३ वर्षे, धंदा- नोकरी
रा. शिवलीला कॉम्प्लेक्स, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड

३) भावेश भालचंद्र पांचाळ
वय- २८ वर्षे, धंदा- व्यवसाय
रा. प्रणय हेल्थ क्लब, तळवलकर नगर,
ता. अलिबाग, जि. रायगड

वादीतर्फे वकील : ॲड. जे. बी. आपटे
जाबदेणार क्र. १ ते ३ एकतर्फा

दिनांक ०५/०१/२०१८ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि. २७/०८/२०१८ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) जाबदेणार क्र. १ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तीक व वैयक्तीकरित्या वादीस रु.३,१४,५५१/- दयावेत व संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत सदर रकमेवर दि.०१/११/२०१७ पासून प्रतिवर्षी १४% दराने होणारे सरळ व्याज दयावे.

३) शिवाय प्रतिवादींनी तपशिलाप्रमाणे दावा खर्चाची रक्कम रुपये ७७७१/- वादीला दयावी व स्वत:चा खर्च स्वत: सोसावा.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | वादी | प्रतिवादी |
|---|---|---|---|
| १ | कोर्ट फी स्टॅम्प | रु. ४,४४०/- | -- |
| २ | कोर्ट फी | रु. ५००/- | -- |
| ३ | वकील फी | रु २७२६/- | रु.२७२६/- |
| ४ | सेवा शुल्क | रु.१०५/- | -- |
| **एकूण रुपये** | | रु.७७७१/- | रु.२७२६/- |

(एकूण अक्षरी रुपये सात हजार सातशे एकाहत्तर मात्र)

आज दि. २७.०८.२०१८ इ. रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

अलिबाग.
दिनांक २७.०८.२०१८

(एस्.एस्.पोरे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी
मु. अलिबाग.